



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784






वर्ष ३ रे अंक : १०० वा गुरूवार दि. २२ मे २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# बदल्यांचे जे नियम वाशिममध्ये ते बुलढाणा जिल्ह्यात का नाही?

## तालुक्याबाहेर बदल्या करण्यास प्रशासनाला रोखलेय कुणी?

**जनसंचलन/बुलढाणा**

- येथील महसूल विभागाअंतर्गत कार्यरत काही तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांच्या बदल्या सातत्याने रोखल्या जात आहेत, तर विशिष्ट लोकांच्या तालुक्यातल्या तालुक्यातच करण्यात येत आहेत. खरे तर ही बाब अतिशय गंभीर आहे. कारण या माध्यमातून शासनाच्या नियमांचे उल्लंघन होत असून, या प्रकरणाकडे जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. वाशिम जिल्ह्यात तालुक्याबाहेर तलाठ्यांच्या बदल्या होऊ शकतात, तर मग बुलढाणा जिल्ह्यात हा नियम का नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.यासंदर्भात सविस्तर माहिती अशी की, वाशिमच्या जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाच्या वेळोवेळी निघालेल्या आदेशानुसार जिल्ह्यातील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या बदल्या या तालुक्याबाहेर करण्याबाबत अंमलबाजवणीचे निर्देश जारी केलेले आहेत. एव्हढेच नाही या बदल्यांसंदर्भात जेंव्हा हे निदर्शनास आले की, अशाप्रकारच्या बदल्यांना विलंब लागत आहे, तर त्यांनी यासंदर्बात कठोर आदेश देत सर्व अधिकाऱ्यांना चक्क समुपदेशनासाठी पाचारण केले आहे. आता प्रश्न असा आहे की, वाशिम जिल्हा आणि बुलढाणा जिल्हा हे दोन्ही जिल्हे महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे राज्य शासनाचे काढलेले आदेश हे दोन्ही जिल्ह्यांना लागू होतात. परंतु एकीकडे त्याच्या अंमलबजावणीसंदर्भात कार्यवाही होते, तर दुसरीकडे बुलढाण्यात मात्र शासनाच्या बदल्यांसंदर्भातील आदेश व नियमांचे उघडपणे उल्लंघन होत आहे. बुलढाणा महसूल विभागात काही विशिष्ट अधिकाऱ्यांना बदल्यांमध्ये सरळ-सरळ नियम व कायदे मोडून संरक्षण मिळत आहे. यामध्ये प्रामुख्याने नाव समोर येते ते वादग्रस्त महाभ्रष्टाचारी आणि महाठग मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांचे. टेकाळे हे महसूलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे जावई आहेत काय, असा प्रश्न त्यांच्या कामकाजावरून दिसून येते. महसूल विभागात एकीकडे टेकाळे यांच्या बेबंद भ्रष्टाचाराला संरक्षण दिले जात आहे, तर दुसरीकडे त्यांना बदलीमध्ये प्रमाणाच्या बाहेर नियमभंग करून सुविधा दिली जात आहे. विजय दत्तात्रय टेकाळे यांनी आजवर महसूल विभागात प्रचंड प्रमाणात नियम व कायदे पायदळी तुडवले आहेत. ज्या शासनाचा पगार खातात, त्याच शासनाच्या महसूलाला चुना लावला आहे. कागदपत्रांमध्ये मोठी हेरफेर केली आहे. तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन, वाटणी पत्रात नियमांचा भंग, असे नाना प्रकार केलेले आहेत. यातून बेशरमपणे भ्रष्टाचार केला आहे. हा भ्रष्टाचार करताना कसलीही लाज-शरम त्यांनी बाळगली नाही. विशेष म्हणजे टेकाळे यांचा हा भ्रष्टाचार आज महसूल विभागाच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना ज्ञात आहे. कोणीही यापासून अनभिज्ञ नाही. तरीही टेकाळे यांच्यावर कोणीही कारवाई करीत नाही. दुसरीकडे टेकाळे हे वर्षानुवर्षांपासून एकाच कार्यालयात, एकाच पदावर कार्यरत आहेत. त्यांची वर्षानुवर्षे बदली देखील होत नाही. एकाच जागेवर बसून ते वर्षानुवर्षे बेबंदपणे भ्रष्टाचार

**विजय दत्तात्रय टेकाळे यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या व करीत असलेल्या नियमबाह्य शासकीय कामात भ्रष्टाचारातून कमावलेली करोडो रुपयांची चल अचल संपत्ती शेकडो सातबारे प्रकरणात सुरू असलेली खुली चौकशी अंतिम टप्प्यात**

करता यावा, यासाठी अधिकारी त्यांची बदली होऊ देत नाहीएत. यावरून हे स्पष्ट आहे की, महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी हे टेकाळे यांना एकप्रकारे भ्रष्टाचारासाठी प्रोत्साहन देत आहेत. एकीकडे टेकाळे अधिकाऱ्यांच्या वरदहस्ताने हे प्रताप करीत असताना दुसरीकडे त्यांना बदलीमधूनही प्रचंड सूट दिली जात आहे. वास्तविकत: शासनाच्या नियमानुसार कोण्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याची बदली ही तीन वर्षांच्या आत व्हायलाच पाहिजे. मात्र, त्यापेक्षा कितीतरी अधिक वर्षे होऊन देखील काही अधिकाऱ्यांच्या बदल्या होत नाही. यावरून हे स्पष्ट आहे की, महसूल प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी कुठल्या तरी दबावाखाली काम करीत आहेत. अन्यथा शासनाचे नियम मोडण्याची हिम्मत कोण्याही अधिकाऱ्याची होणार नाही. टेकाळे यांनी एकीकडे संघटनेला हाताशी धरून आणि दुसरीकडे काही लोकप्रतिनिधींचे संरक्षण प्राप्त करून आपला भ्रष्टाचरा व बदल्यांना संरक्षण प्राप्त करून घेतले आहे. परंतु त्यामुळे उघडपणे शासनाच्या नियमांचे उल्लंघन होताना दिसून येत




आहे. अधिकारीच आता भ्रष्टाचाऱ्यांना संरक्षण देत असतील, तर राज्याच्या महसूल मंत्रांनी या प्रकाराकडे लक्ष देणे गरजेचे आहे. कारण अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे शासनाची प्रतिमा डागाळत चालली आहे. जे नियम महाराष्ट्रातील वाशिम जिल्ह्यात लागू होत आहेत, तेच नियम बुलढाणा जिल्ह्यालाही लागू झाले पाहिजे. त्यामुळे टेकाळे आणि त्यांच्यासारखे महसूल विभागातील जे महाभाग वर्षानुवर्षे एकाच जागी चिकटून बसले आहेत, त्यांची तात्काळ तालुक्याच्या बाहेर बदली व्हावी. एव्हढेच नाही तर भ्रष्टाचाऱ्यांवर फौजदारी करावाई व्हावी आणि त्यांची बेनामी संपत्ती जप्त करण्यात यावी. असे झाल्यास महसूल विभागाची प्रतिमा उंचावेल, अन्यथा जनतेच्या मनात अधिकाऱ्यांविषयी रोष आगामी काळात वाढल्याशिवाय राहणार नाही.

अजून बरेच काही पुढील भागात..

# चिखली चे गट शिक्षण अधिकारी विरुद्ध कारवाई न झाल्याने दुसऱ्या दिवशी उपोषण सुरु

**जनसंचलन/ चिखली**

खरे दिव्यांगाना डावलून स्वतः खोटे व बनावट दिव्यांग प्रमाणपत्र च्या आधारे,आर्थिक व राजकीय पाठबळाचा वापर करून केंद्र प्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी व गट शिक्षण अधिकारी पदावर विराजमान होणे तसेच सन २०२४ मध्ये पवित्र पोर्टल मार्फत शासनाकडून नविन नियुक्त केलेल्या शिक्षण सेवकांना विहित मुदतीत नियुक्त न करता लाखो रूपये घेऊन शिक्षक सेवकांना नियमबाह्य रूजू करून घेतल्या प्रकरणी रमेश रतन डुकरे पाटील,गटशिक्षण अधिकारी पं.सं. चिखली यांची उच्च स्तरीय चौकशी करून संबंधीत शिक्षक सेवकांच्या नियुक्त्या रद्द करून गट शिक्षण अधिकारी रमेश रतन डुकरे पाटील यांना तात्काळ कायमस्वरूपी बडतर्फ करणे बाबत भारतीय मानवाधिकार संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी बुलडाणा व मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. यांना निवेदनद्वारे केली होते. दि ३० एप्रिल २०२५ रोजी आमरण उपोषणास सुरुवात करण्यात आली होती. परंतु शिक्षण अधिकारी प्राथमिक श्री खरात यांनी संबंधित गट शिक्षण अधिकारी यांच्यावर नीकायदेशीर कारवाई करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले परंतु कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने दि २० मे २०२५ पासून अमरण उपोषण सुरु करण्यात आले. आज उपोषणाचा दुसरा दिवस परंतु कोणीच फडकले सुद्धा नाही. गट शिक्षण अधिकारी चिखली याच्या विरुद्ध तक्रारी असल्यामुळे शिक्षण अधिकारी प्राथमिक यांनी सर्वात प्रथम त्यांच्याकडे असलेला प्रभार काढायला पाहिजे होता नंतर खातेनिहाय चकशी करून एक ते चार जोडपत्र बजावणे आवश्यक होते परंतु फक्त नोटीस देण्यात आली त्या नोटीस ला हि त्यांनी उत्तर दिले नाही याचा अर्थ त्यांना पूर्णतः वाचवीन्याच काम ते करीत आहे. तसेच गट शिक्षण अधिकारी यांच्या पाठीशी फार मोठा राजकी पाठिंबा असल्यामुळे त्याचा सीडीआर तपासण्यात यावा जेणेकरून त्यांना कोणते राजकीय नेते वाचवीत आहे हे पण लक्षात येईल अशी मागणी उपोषण कर्ते प्रशांत डोंगरदिवे यांनी व्यक्त केले. यावेळी सम्राट सामाजिक संघटनेचे अध्यक्ष आशिष बाबा खरात, वंचित चे मा जिल्हा अध्यक्ष जितेंद्र जैन,मा जी प सदस्य ॲड सुमित सरदार, वंचित बहुजन आघाडी चे शहर अध्यक्ष मिलिंद वानखडे, राजे छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य विचार मंच चे अध्यक्ष अंबादास घेवंदे, वंचित शहर महासचिव, विजय राऊत, दिलीप राजभोज, राजे छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य विचार मंच चे अध्यक्ष अंबादास घेवंदे, शेतकरी नेते नितीन राजपूत, यांनी जाहीर पाठींबा दर्शवीला आहे.

# ...पावसाच्या थेंबांपासून ऊर्जा...

## संपादकीय लेख



मुसळधार पाऊस पडून वीजपुरवठा खंडित होण्याचा अनुभव आपल्यासाठी नवीन नाही. पण पावसाच्या थेंबापासून वीज निर्माण करता आली तर? अनेक वर्षांपासून जगभरातील वैज्ञानिक ही भविष्यवादी कल्पना सत्यात उतरवण्याच्या प्रयत्नात आहेत.पावसाच्या थेंबांमध्ये मुबलक गतिज ऊर्जा असते. हे थेंब एखाद्या पृष्ठभागावर आदळल्यानंतर ही ऊर्जा ध्वनी आणि इतर प्रकारच्या उर्जेमध्ये रूपांतरित होऊन विरून जाते. पण काही विशिष्ट पदार्थ ही ऊर्जा शोषून घेऊन तिचे विद्युत उर्जेत रूपांतर करू शकतात. त्यांना दाबविद्युतीय पदार्थ ( पायझोइलेक्ट्रिक ) म्हणतात. क्वाट्र्झ, टूरमलाइन स्फटिक, काही प्रकारचे सिरॅमिक, लेड झरकोनेट टाइटनेट , पॉलीविनीलिडीन फ्लोराइड ही त्याची ठळक उदाहरणे आहेत . याचप्रमाणे घर्षण आणि कंपनांमधील ऊर्जा शोषून विद्युतउर्जेत रूपांतर करणाऱ्या पदार्थांना घर्षणविद्युतीय पदार्थ म्हणतात. थेंबाच्या आघातातून निर्माण होणारी कंपने शोषून घेऊन विद्युतनिर्मिती करणारे अनेक पॉलिमर आहेत. आत्ताची प्रारूपे यावरच आधारित आहेत. त्यांचा वरचा भाग म्हणजे विद्युनिर्मिती करणाऱ्या पदार्थाचा पत्र्यासारखा थर असतो व खाली बॅटरी जोडलेल्या असतात. थेंबाच्या आघाताने वरच्या थरात विद्युतदाब तयार होतो व बॅटरी चार्ज होतात. या बॅटरीवर १२ वॉटपर्यंतचे एलईडी आणि कमी क्षमतेची काही उपकरणे चालवण्यात वैज्ञानिक यशस्वी ठरले आहेत. पण आजघडीला या प्रारूपांची कार्यक्षमता कमी आहे. थेंबामधील केवळ दहा टक्के ऊर्जेचे विद्युतउर्जेत रूपांतर होते. पावसाचे प्रमाण, थेंबांचा आकार, वातावरणातील धुळीचे प्रमाण यांमुळे तयार होणाऱ्या विजेचे प्रमाणही कमी-जास्त होत राहते. शिवाय हे तंत्रज्ञान महागडे आहे . त्यांची कार्यक्षमता वाढवून, किंमत कमी करणे हे वैज्ञानिकांसमोरचे खरे आव्हान आहे. पावसाच्या थेंबांपासून विद्युतनिर्मिती करण्याचे तंत्रज्ञान आज प्रायोगिक स्तरावर आहे. पण लवकरच घराची कौले , पत्रे आणि मोठ्या पॅनेलमध्ये ते आपल्याला पाहायला मिळेल, असा विश्वास वैज्ञानिकांना वाटतो. भारतासारख्या भरपूर पाऊस पडणाऱ्या देशांमध्ये दाट वस्तीच्या ठिकाणी हे तंत्रज्ञान विशेष फायद्याचे ठरेल.

# जिल्हाधिकारी कार्यालयात दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन साजरा

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हाधिकारी कार्यालयात आज दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनफ साजरा करण्यात आला. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन साजरा करण्यात येतो. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार व उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या



प्रतिमेस अभिवादन केले. यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचाऱ्यांना ङ्कदहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथफ दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित अधिकारी कर्मचा-यांनीही यावेळी प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

# वासराला जन्म देताना गायीचा मृत्यू

**जनसंचलन/बुलढाणा**

जनावरांचा सांभाळ करतोस, पण संकटाच्या क्षणी कोण साथ देतो?ङ्क खंडाळा येथे मंगळवारी सकाळी घडलेली घटना हा प्रश्न पुन्हा समोर आणते. वासराला जन्म देताना असह्य वेदनांनी विव्हळलेल्या गायीसाठी वैद्यकीय मदत मिळवण्याचे प्रयत्न अखेर निष्फळ ठरले आणि गायीसह वासराचाही मृत्यू झाला. क्रीडा संकुलाजवळ फिरायला गेलेल्या काही नागरिकांनी गायीची आगतिकता पाहून शासकीय पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना संपर्क केला. माजी सरपंच रतन मानघाले यांनाही माहिती देण्यात आली. मात्र, अधिकाऱ्यांकडून कोणतीही तत्काळ मदत मिळाली नाही. वेळ निघून गेली आणि एक सोशल मीडियावर संतापाची लाट घटनेची माहिती सोशल मीडियावर पसरताच अनेकांनी पशुवैद्यकीय व्यवस्थेच्या दुर्लक्षिततेवर रोष व्यक्त केला. शेतकरी जसा आपल्या जनावरांची काळजी घेतो, तशीच तत्परता यंत्रणेकडूनही अपेक्षित आहे. पशुधन विकास अधिकारी डॉ. आनंद आस्वार यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. गाय आणि वासराला वैद्यकीय मदतच मिळाली नाही. त्यामुळे, संताप व्यक्त होत आहे नवजात जीव जन्माला येण्यापूर्वीच संपला. पाहता पाहता गायही शेवटच्या श्वास घेत विसावली. घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी ही वेदनादायक घटना पाहतानाच संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या. दरम्यान, वेळेवर मदत मिळाली असती तर गाय वासराचा जीव वाचला असता, असे माजी सरपंच रतन मानघाले यांनी सांगितले.

# माय भारत योजना; नागरी संरक्षण स्वयंसेवक नोंदणी सुरू...

**जनसंचलन/बुलढाणा**

माय भारत, भारत सरकारच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालय (नवी दिल्ली) अंतर्गत नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्यासाठी देशभरातील तरुणांना सक्रियपणे एकत्रित केले जात आहे. हा देशव्यापी उपक्रम तरुण नागरिकांना राष्ट्रीय कार्यात सहभागी करून घेण्याचा आणि विशेषतः आणीबाणी व संकटाच्या वेळी महत्त्वाची भूमिका पार पाडण्यासाठी सक्षम करण्याचा प्रयत्न आहे. नैसर्गिक आपत्ती, अपघात, सार्वजनिक आणीबाणी आणि इतर अनपेक्षित परिस्थितीत नागरी प्रशासनास सहकार्य करू शकणारे एक प्रशिक्षित, प्रतिसाद क्षम व लवचिक स्वयंसेवक दल तयार करणे, हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सध्याची परिस्थिती आणि वाढत्या सुरक्षा चिंता लक्षात घेता, एक मजबूत समुदायाधारित प्रतिसाद यंत्रणा उभारण्याची निकड आहे. नागरी संरक्षण स्वयंसेवक स्थानिक प्रशासनाला बचाव व निर्वासन, प्रथमोपचार अशा विविध सेवा देण्यामध्ये मोलाची मदत करतात. नोंदणीसाठी ://.. या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिले असून नोंदणी प्रक्रिया सोपी आणि सर्वांसाठी खुली आहे. तरुणांनी पुढे येऊन या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर यांनी केले आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अभिषेक बच्चन नेपोटिझमचा बळी ठरला, या ट्विटर पोस्टवर बिग बींनी व्यक्त केली खंत- एक वडील म्हणून...



**मुंबई:** ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन वयाच्या ८२व्या वर्षीदेखील विविध माध्यमांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येतात. सिनेमा असो किंवा टेलिव्हिजन ते विशेष सक्रिय आहेत. याशिवाय ते सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातूनदेखील प्रेक्षकांशी संवाद साधतात. बिग बी एक्स या प्लॅटफॉर्मवर (पूर्वीचे ट्विटर) विशेष सक्रिय आहेत. क्रिकेट, सिनेमा, कुटुंबीय किंवा इतर कोणत्याही विषयावर त्यांचे दररोज एकतरी ट्वीट असतेच. मुलगा अभिषेक बच्चनविषयी आणि त्याच्या सिनेमांविषयी ते अनेकदा पोस्ट शेअर करतात. ४ मार्च रोजीदेखील त्यांनी अभिषेकविषयी पोस्ट केली असून, त्याच्यावर झालेल्या अन्यायाविषयी बिग बींनी भाष्य केले. अभिषेक नेपोटिझमचा बळी ठरला, याविषयी भाष्य करणारी एक पोस्ट एक्स प्लॅटफॉर्मवर शेअर करण्यात आलेली. अमिताभ यांनी हिच पोस्ट त्यांच्या प्रोफाइलवर रीट्विट केली आणि त्यावर एका ओळीचे कॅप्शन देत लक्ष वेधून घेतले.ट्विटरवर मनोरंजनविषयक पोस्ट शेअर करणाऱ्या एका पेजवरुन अशी पोस्ट करण्यात आलेली की, अभिषेक बच्चन विनाकारण नेपोटिझम नकारात्मकतेचा बळी ठरला, पण त्याच्या फिल्मोग्राफीमध्ये चांगल्या चित्रपटांचे प्रमाण खुप जास्त आहे. ही पोस्ट रीट्वीट करत अमिताभ यांनी लिहिले की, मलाही असेच वाटते... आणि केवळ त्याचे वडील म्हणून मला असे वाटते असे नाही. नेपोटिझम या विषयावर भाष्य करणारी पोस्ट अमिताभ यांनी शेअर केल्याने, त्याची विशेष चर्चा झाली. अमिताभ यांच्या कमेंटवर असंख्य कमेंटही आल्या आहेत. आणखी एका ट्वीटमध्ये अमिताभ यांनी अभिषेकच्या आगामी चित्रपटाचा ट्रेलर शेअर केला आहे. अभिषेक बी हॅप्पी या सिनेमात महत्त्वाची भूमिका साकारत असून त्याविषयी पोस्ट शेअरता बिग बी म्हणाले की, अभिषेक, तू विलक्षण आहेस. तू प्रत्येक चित्रपटातील पात्राशी कसे जुळवून घेतो आणि त्यानुसार बदलतोस ही एक कला आहे, जी अविश्वसनीय आहे. लव्ह यू भय्यू. अभिषेकचे कौतुक करणाऱ्या इतरही काही पोस्ट त्यांनी सोशल मीडियावर शेअर केल्या होत्या. ज्युनिअर बच्चनच्या कामाबद्दल सांगायचे झाल्यास तो अलिकडच्या काळात आय वॉन्ट टू टॉक, घूमर, दसवी, लुडो या चित्रपटांमध्ये दिसला होता.

## भारताविरुद्ध पराभवाचा धक्का असह्य; ऑस्ट्रेलियाला मोठा झटका, स्टीव्ह स्मिथ वनडेतून निवृत्त....




**मुंबई:** २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमधील ऑस्ट्रेलिया संघाचा प्रवास संपला आहे. उपांत्य सामन्यात भारताविरुद्ध त्यांना ४ विकेट्सने पराभव पत्करावा लागला. या पराभवानंतर संघाचा कर्णधार स्टीव्ह स्मिथने मोठी घोषणा केली आहे. स्टीव्ह स्मिथने एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. स्टीव्ह स्मिथ कसोटी आणि टी-२० स्वरूपात खेळत राहील. स्टीव्ह स्मिथने ऑस्ट्रेलियाकडून जवळजवळ १५ वर्षे एकदिवसीय क्रिकेट खेळले. या काळात त्याने अनेक वेळा संघाचे नेतृत्वही केले. २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्येही पॅट कमिन्सच्या अनुपस्थितीत ऑस्ट्रेलियाने त्याच्यावर विश्वास दाखवला.चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीतील पराभवानंतर ३५ वर्षीय स्टीव्ह स्मिथने त्याच्या संघातील सहकाऱ्यांना त्याच्या निर्णयाची माहिती दिली. स्टीव्ह स्मिथ म्हणाला, ङ्गङ्घहा एक अद्भुत प्रवास होता आणि मी त्यातील प्रत्येक क्षणाचा आनंद घेतला. खूप छान क्षण आणि अद्भुत आठवणी आहेत. दोन विश्वचषक जिंकणे ही एक मोठी कामगिरी होती आणि हा प्रवास शेअर करण्यासाठी अनेक अद्भुत सहकारी होते. २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाची तयारी सुरू करण्याची ही एक उत्तम संधी आहे, त्यामुळे हीच योग्य वेळ वाटते.फ्फस्टीव्ह स्मिथ पुढे म्हणाला, ङ्गङ्घ कसोटी क्रिकेट अजूनही प्राधान्य आहे आणि मी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलमध्ये, हिवाळ्यात वेस्ट इंडिजमध्ये आणि नंतर घरच्या मैदानावर इंग्लंडविरुद्ध खेळण्यास उत्सुक आहे. मला वाटते की त्या व्यासपीठावर मला अजूनही खूप काही योगदान द्यायचे आहे.फ्फस्टीव्ह स्मिथने २०१० मध्ये एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. या काळात त्याने ऑस्ट्रेलियासाठी एकूण १७० एकदिवसीय सामने खेळले. एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने ४३.२८ च्या सरासरीने ५८०० धावा केल्या, ज्यामध्ये ३५ अर्धशतके आणि १२ शतके समाविष्ट आहेत. तो त्याच्या देशासाठी सर्वाधिक एकदिवसीय धावा करणारा १६वा आणि १२वा खेळाडू आहे. त्याच वेळी, टीम इंडियाविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यातही त्याची कामगिरी चांगली होती. स्मिथने भारताविरुद्ध ३० एकदिवसीय सामने खेळले आणि ५३.१९ च्या सरासरीने १३८३ धावा केल्या. ज्यामध्ये ७ अर्धशतके आणि ५ शतके देखील समाविष्ट आहेत

## सोने तस्करी प्रकरणी अटक झाल्यानंतर साऊथ स्टारचा भलताच दावा



**मुंबई:** कन्नड चित्रपट स्टार रान्या रावला मंगळवार, ४ मार्च रोजी सोन्याच्या तस्करी प्रकरणात अटक करण्यात आली. तिला बंगळुरू आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक करण्यात आली. अटकेनंतर आता रान्या रावने एक धक्कादायक दावा केला असून, चौकशीदरम्यान तिने पोलिसांना सांगितले की तिला सोन्याची तस्करी करण्यासाठी ब्लॅकमेल करण्यात आले होते. याप्रकरणी पोलिसांनी कॉन्स्टेबल बसवराजू यांनाही ताब्यात घेतले आणि विमानतळावर अभिनेत्रीला मदत करण्यामध्ये त्यांचा हात असल्याचे जबाबात नोंदवण्यात आले आहे. रान्याला अटक केल्यानंतर पोलिसांनी तिच्या घरावर छापा टाकला होता. यामध्ये पोलिसांनी २.६७ कोटी रुपयांची रोखरक्कम आणि २.०६ कोटी रुपयांचे सोने जप्त केले. छाप्यादरम्यान, पोलिसांनी रान्याच्या घरातून तीन मोठे बॉक्स देखील जप्त केले, त्यानंतर जप्तीची एकूण किंमत १७.२९ कोटी रुपये झाली होती.रान्या बंगळुरूमधील केआयए विमानतळावर (कॅम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळ) उतरताच, तिने पोलीस कॉन्स्टेबल बसवराजूच्या मदतीने सुरक्षा तपासणी चुकवून तिथून निसटण्याचा प्रयत्न केला. पण डीआरआय तिच्या हालचालींवर लक्ष ठेवून होते. गेल्या १५ दिवसांत चार वेळा दुबईला गेल्याने ती डीआरआयच्या रडारवर आली होती.रान्या राव एअरपोर्ट सुरक्षा तपासणीच्या ठिकाणाहून निसटण्याचा प्रयत्न करत असताना डीआरआयने तिला रंगेहाथ पकडले. अधिकाऱ्यांनी अभिनेत्रीच्या जॅकेटमधून १२.५६ कोटी रुपयांचे १४.२ किलो सोने जप्त केले. तिने जॅकेटमध्ये सोन्याचे बार लपवले होते. सोने जप्त केल्यानंतर रान्याला अटक करण्यात आली आणि पुढील चौकशीसाठी नागावरा येथील डीआरआय कार्यालयात नेण्यात आले.रान्या रावच्या कारकिर्दीबद्दल बोलायचे झाले तर तिने कन्नड आणि तामिळ चित्रपटांमध्ये काम केले आहे. ती कर्नाटक राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळाचे डीजीपी रामचंद्र राव यांची सावत्र मुलगी आहे. रान्या रावला आता १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. डीआरआयचे अधिकारी याप्रकरणी तपास करत आहेत की, सोन्याच्या तस्करीमध्ये अभिनेत्रीचा एकटीचा सहभाग होता की, ती एखाद्या बड्या तस्करी टोळीशी संबंधित आहे.

# विराट कोहलीचे टीव्ही मालिकेत पदार्पण? लोकप्रिय स्टारचा तो फोटो पाहून चक्रावले नेटकरी...

**मुंबई:** अभिनेत्री अनुष्का शर्माचा नवरा आणि भारताचा स्टार क्रिकेटपटू विराट कोहली विविध कारणामुळे नेहमी चर्चेत येतो. आता त्याच्या टीव्ही डेब्यूची चर्चा रंगली आहे. तुर्की अभिनेता चा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, विराटशी असलेल्या साधर्म्याबद्दल बोलले जाते आहे. इंटरनेटवर अभिनेत्याचा हा फोटो चांगलाच व्हायरल झाला असून, त्यावर असंख्य कमेंटही आल्या आहेत. रेडिट युजरने कॅव्हिटचा हा फोटो शेअर केला आहे. : या तुर्कीश ड्रामा सीरिजमधील हा फोटो असून कॅव्हिट आणि विराट यांच्यातील साधर्म्यामुळे क्रिकेटपटूच्या चाहत्यांनी कमेंट करत आश्चर्य व्यक्त केले. अनेकांनी मजेशीर कमेंटही केल्या आहेत. रेडिट युजरने या टीव्ही सीरिजमधील एक फोटो शेअर करत म्हटले की, अनुष्का शर्माच्या पतीचा टीव्ही शो डेब्यू. या कॅप्शनसह फोटो शेअर करण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात आले, पण नीट पाहिल्यास हा फोटो विराटचा नसून कॅव्हिट नावाच्या अभिनेत्याचा आहे हे



लक्षात येते. या फोटोमध्ये कॅव्हिटच्या पात्राने टोपी घातली असून त्याच्या हातात काहीतरी दिसते आहे. अनेक युजर्सनी या पोस्टवर कोहली आणि अभिनेत्याच्या चेहऱ्यामधील साम्याविषयी भाष्य केले. काहींनी हे साम्य भयावह असल्याचेही म्हटले. एका युजरने कमेंट केली आहे की, एकसारखेच पण वेगळे. अन्य एकाची अशी कमेंट आहे की, हा विनोद नाही. एर्टुगरुलमधील डोगान बेचे हे पात्र मी पहिल्यांदा पाहिले तेव्हा मला वाटले की कोहली तुर्की मालिकेत काय करत आहे? हे साम्य भयानक आहे. एकाने असे लिहिले की, हा तिथे पण पोहोचला का? अन्य एका रेडिट युजरने मजेशीर कमेंट करत असेही लिहिले आहे की, रब ने बना दी जोडीमुळे अनुष्का त्याला ओळखणार नाही.एर्टुगरुल ही मालिका मेहमेत बोजदाग यांनी तयार केली असून ऐतिहासिक साहसी सीरीज प्रकारातील आहे. या मालिकेत एर्टुगरुल बे या मुख्य भूमिकेत एन्गिन अल्टान डुझ्याटन असून, कॅव्हिट एक महत्त्वाची भूमिका साकारतो आहे. याशिवाय केतिन गुनेर, कान तासनर आणि हुल्या डार्कन आहेत. १३ व्या शतकातील काळावर आधारित ही मालिका ओटोमन साम्राज्याचे संस्थापक उस्मान प्रथम यांचे वडील एर्टुगरुलच्या जीवनावर आधारित आहे. २०१४ साली आलेली ही मालिका २०१९पर्यंत ५ सीझन चालली.

# महिला बाल विकास मंत्र्यांच्या तालुक्यातच ६ विद्यार्थिनींचा विनयभंग, शिक्षकाला ठोकल्या बेड्या

**रायगड:** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांच्या तालुक्यातील मुलीच सुरक्षित नसतील तर महाराष्ट्रातील मुली सुरक्षित आहेत का? असा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित होतोय.महाराष्ट्र हे कायदा आणि सुव्यवस्थेचं राज्य म्हणून ओळखलं जातं. पण याच महाराष्ट्रातील मुलींसाठी शाळा कितपत सुरक्षित आहेत? हा गंभीर प्रश्न आहे.अनेक संतापजनक घटना ताज्या असताना आता रोह्यातील न्यू इंग्लिश स्कूलमधील एका शिक्षकाचा चीड आणणारा प्रताप समोर आला आहे. रोहा तालुक्यातील एका प्रसिद्ध शाळेतील एक धक्कादायक वृत्त समोर येत आहे. शाळेतील शिक्षक अनिल कुंभार यांनी शाळेत शिकणाऱ्या तब्बल ६ मुलींवर विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या संदर्भात रोहा पोलीस ठाण्यात पॉक्सो कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करून शिक्षक अनिल कुंभार यांना अटक करण्यात आली आहे.याबाबत सविस्तर घटना अशी की, दि.२४ मार्च रोजी सकाळी ८ ते ९ वाजण्याच्या सुमारास पीडित विद्यार्थिनी वर्गात शिकत असताना आरोपी शिक्षक अनिल कुंभार याने त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध अयोग्यरित्या स्पर्श करून विनयभंग केल्याची तक्रार ६ विद्यार्थीनींनी केली आहे. त्यांच्या वक्तव्याच्या आधारे पोलिसांनी तातडीने कारवाई करून आरोपी अनिल कुंभार याला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस सबइन्स्पेक्टर खतीब यांच्यामार्फत सुरू आहे.याबाबत आरोपीविरुद्ध पुरेसे पुरावे गोळा केले जात असून, त्याआधारे लवकरच कायदेशीर पावले उचलली जातील, असे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणात पोक्सो कायद्याची कलमे लावण्यात आली असून,आरोपीला कठोर शिक्षा होण्याची शक्यता आहे.सुमारे ६ मुलींबाबत ही घृणास्पद घटना घडल्याने स्थानिक नागरिक आणि पालकांमधून प्रचंड संताप व्यक्त होत आहे. या विकृत मानसिकतेचं काय करायचं? त्यांची अशी कृत्य फोफावू नये म्हणून त्यांना कठोरात कठोर काही कारवाई केली जाणार आहे की नाही? विशेष म्हणजे असे प्रकार कितीवेळा महाराष्ट्राच्या लेकींनी सहन करायचे? असे प्रश्न आता जनसामान्यांमधून उपस्थित होत आहेत.

# खारी, टोस्ट आणण्यासाठी निघालेल्या व्यावसायिकावर गोळीबार, पहाटेच्या घटनेने खळबळ

**छत्रपती संभाजीनगर :** भल्या पहाटे रोजा केल्यानंतर दुचाकीवरून खारी टोस्ट आणण्यासाठी जात असलेल्या एका युवकावर अज्ञाताने गोळीबार केल्याची घटना २६ मार्च रोजी पहाटे चारच्या सुमारास नवाबपुरा भागातील जालीवाली मशिदीजवळ घडली. या घटनेनंतर गोळीबार करणाऱ्याचा शोध पोलिसांनी सुरू केला आहे. आसपासच्या सीसीटीव्हीसह संशयितांचाही शोध पोलिस घेत आहेत. या प्रकरणात जिन्सी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिन्सी पोलिस ठाण्यात हसीब महंमद सलीम काझी (वय ३३, रा. जालीवाली मशिदीजवळ, नवाबपुरा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, हसीब काझी जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार करतात. २६ मे रोजी पहाटे चारच्या दरम्यान ते दुचाकीवरून खारी टोस्ट आणण्यासाठी रोशन गेट, सिमा दूध डेअरीकडे निघले होते. घरापासून पन्नास फुटांच्या अंतरावर असताना फटाका फुटल्यासारखा आवाज आला. हा आवाज येताच गाडीचा टायर फुटला का? यामुळे हसीब काझी यांनी दुचाकी थांबवली.गाडी पाहत असता, त्याच्यापासून १५ फुटांच्या अंतरावर एक सहा फूट उंच, सडपातळ बांध्याची व्यक्ती उभी असलेली दिसली.

त्या व्यक्तीने हसीब काझी याच्याकडे पाहून हातातील बंदुकीने एक गोळी झाडली. ही गोळी हसीब काझी यांच्या टोपीच्या जवळून गेली. हसीब काझी यांनी त्वरित त्यांची दुचाकी चालू केली. पुन्हा घराकडे धाव घेतली. या प्रकरणात हसीब काझी यांनी त्यांचा जीव घेण्याच्या उद्देशाने त्यांच्यावर दोन राउंड फायर करणाऱ्या व्यक्तीच्या विरोधात जिन्सी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक साळुंखे करीत आहेत.

जिन्सी भागात एका व्यावसायिकावर गोळीबार झाल्याचे प्रकरण समोर येताच, पोलिस विभागही कामाला लागले आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी जिन्सी पोलिस ठाण्याचे तीन पथके आणि गुन्हे शाखेचे चार पथके कामाला लागली आहे. आसपास सीसीटीव्हीतून संशयितांचा शोध सुरू केला आहे. याशिवाय तक्रारीत संशयिताचाही शोध घेण्यात येत आहे.

या प्रकरणात हसीब काझी यांच्यावर झालेलया हल्ल्यानंतर ते घरी गेले. त्यांनी उजेड झाल्यानंतर त्यांची गाडीची पाहणी केली असता, दुचाकीवरील डाव्या बाजूला इंग्रजीत लिहिलेल्या दुचाकीच्या नावाच्या ठिकाणी गोळी लागून, त्या ठिकाणी




छिद्रे पडल्याचे त्यांच्या निदर्शनास आली अशीही माहिती समोर आली आहे.

हसीब काझी यांनी त्यांच्यावर झालेल्या गोळीबार प्रकरणात दिलेल्या तक्रारीत सांगितले, की हसीब काझी यांच्याकडे दुकान भाड्याने घेतलेल्या नासेर सय्यद रौफ (रा. कटकट गेट) याच्यासोबत वाद सुरू आहे. त्याला आणखी एक दुकान पाहिजे. त्याने इतर भाडेकरूंना सोबत घेऊन, क्रांतीचौक पोलिस ठाण्यात खोटी तक्रार दिली. त्या गुन्ह्यात बी फायनल गेल्याने, नासेर रौफ हा हसीब काझी याच्या मित्राला भेटला. त्याने मी हसीब याला पोक्सोमध्ये अडकवेल असे सांगितले. याची व्हिडीओ रिकॉर्डींगही केली. या गोळीबारात नासेर सय्यद रौफ याच्यावर संशय व्यक्त करण्यात आला आहे.

# आजची स्त्री आणि कुटुंब



सद्यस्थितीचा विचार केल्यास आजची स्त्री आणि कुटुंब दोन्ही गोष्टी एकमेकांपासून वेगवेगळ्या करता येत नाहीत. इतक्या त्या एकरूप झाल्या आहेत. एकवेळ पुरुषाविना कुटुंब पूर्ण होईल. मात्र स्त्रीशिवाय कुटुंब कायम अपूर्ण असते.

स्त्री हा कुटुंबाचा कणा असतो. पूर्वीच्या काळातही तिची भूमिका कण्याची होती, आजही आहे आणि उद्याही राहणार आहे. कुटुंबांची व्याख्या काळानुसार बदलत गेली. माझ्या लहानपणी कुटुंब म्हणजे सर्व सख्खे-चुलत धरून १५-२० जणांचं असायचं. त्याकाळीही त्या विस्तारीत कुटुंबाचा कणा स्त्रीच असायची. त्या काळी, म्हणजे साधारण पन्नासएक वर्षापूर्वी, स्त्रीया शिकत असल्या, तरी ते तेवढ्यापुरतंच असायचं. कित्येकींना तर आई-वडिलांनी लग्न करून दिलं म्हणून शिक्षण सोडावं लागायचं. शिक्षणाचा संबंध तेव्हाच्या काळी आजच्यासारखा अर्थर्जनाशी लावलेला नव्हता.

कुटुंब ही संस्थाच मुळी स्त्रीयांमुळे सुरू झाली आहे. कुटुंब व्यवस्था अवतरण्यापूर्वी मनुष्य भटक्या अवस्थेत होता. शिकार, कंदमुळं जिथे मुबलक प्रमाणात मिळेल, अशा जागेच्या शेधात भटकत जायचं. अशी जागा मिळाली की तेथील अन्न संपेपर्यंत तिथे राहायचं आणि त्या ठिकाणचं अन्न संपलं, की मग पुन्हा नवीन जागेच्या शोधात निघायचं. हाच घटनाक्रम वर्षानुवर्ष चालू असायचा. त्या काळचं मनुष्य जीवन, माणसापेक्षा प्राण्यांच्या जवळचं होतं. पुढे कधीतरी शेतीचा शोध लागला आणि मग एकाच जागी राहूनही अन्न मिळवता येतं, हे माणसाच्या लक्षात आलं आणि भटका माणूस स्थिर झाला. शेतीच्या शोधाला कारणीभूत झाली, ती स्त्री. याचाच अर्थ असा की, मनुष्यप्राण्याला ङ्गमाणूसफ म्हणून ओळख मिळवून दिली, ती स्त्रीने. शेतीचा शोध ही मनुष्याच्या उत्क्रांतीतील अतिशय महत्वाची घटना ठरली कारण प्राण्यांसम जीवन जगणारा माणूस, इथून पुढे मनुष्य म्हणून जगू लागला. भटका मनुष्य स्थिर झाला आणि नवरा-बायको-मुलं कुटुंब व्यवस्था आकाराला आली. स्त्री जन्मदात्री होतीच, आता ती कर्तीही झाली..! मनुष्यप्राण्याला माणूस बनवणारी आणि जिच्यामुळे कुटुंबव्यवस्था जन्माला आली, ती स्त्री त्या कुटुंबाचा कणाच कशाला, पायाही न होती, तरच नवल. स्त्री हा कुटुंबव्यवस्थेचा पाया झाली, तो आजतागायत आणि पुढेही राहील. स्त्री ही नुसतीच कुटुंबाचा कणा नाही, तर जागायचं कशाला हे शिकवणा-या संस्कृतीचा स्त्रोतही आहे. प्राणी अवस्थेतून मनुष्य अवस्थेत येताना एक ठळक फरक घडला आणि तो म्हणजे मनुष्य सुसंस्कृत होत गेला. संस्कृतीला स्त्रीनेच जन्म दिला असावा, हे ङ्गसंस्कृतीफ या स्त्रीलिंगी शब्दांवरूनही कळते.

कुटुंबाचा कणा असलेली स्त्री आज घर आणि कार्यालय अशा दोन्ही आघाडय़ांवर लढताना दिसतेय. तिची दमछाक होतेय हे खरं असलं, तरी शक्तीचा अमर्याद स्त्रोत असलेली ती, या दोन्ही आघाडय़ांवर समर्थपणे लढताना दिसतेय. कालपर्यंत घरात असणारी स्त्री, अर्थार्जनासाठी घराबाहेर पडल्याने, तिची नवनवीन क्षितिजं धुंडाळण्याची आसं वाढू लागली. कर्तृत्वाची नवी क्षेत्र तिला खुणावू लागली. तिच्या आयुष्यात आता ङ्गकरिअरफ नावाची एक नवीनच नवलाची गोष्ट आली. गेल्या काही वर्षातील सर्वच क्षेत्रातील घटनांवर नजर टाकली, तर घराबाहेरची जबाबदारीही स्त्री समर्थपणे पेलताना दिसते. असं असलं तरी, काही तुरळक अपवाद वगळता, जेव्हा कुटुंब आणि करिअर यातील कुठलीही एक गोष्ट निवडायची पाळी येते, तेव्हा मात्र स्त्री कुटुंबाला प्राधान्य देताना आढळते. पुरुषाच्या कर्तृत्वाला आभाळ मोकळं करून देताना दिसते. उगाच नाही प्रत्येक कर्तृत्वान पुरुषाच्या मागे एक स्त्री असतेम असं म्हणत. आपली पुरुषप्रधान समाजव्यवस्था आता हळूहळू मागे पडताना आढळत असली, तरी अजून ती म्हणावी तशी संपलेली नाही. काही कुटुंबांमध्ये मात्र त्या कुटुंबातील स्त्रीतल्या पोटेन्शिअलला ओळखून तिला त्या कुटुंबातल्या इतर सदस्यांचा खंबीर पाठिंबा मिळू लागलाय. हे चित्र अजूनही दुर्मीळ असलं, तरी आश्वासक आहे.

स्त्रीशिवाय कुटुंबं अशक्य आणि कुटुंबाशिवाय समाज अशक्य. म्हणून तर स्त्री हा केवळ कुटुंबांचाच नव्हे, तर समाजाचा आणि पर्यायाने एखाद्या देशाचाच पाया असतो. म्हणून ज्या समाजात स्त्री दुय्यम होते, त्या समाजाचं भवितव्य अवघड होते. मध्यपूर्वेतील देशात आजही स्त्रीयांना, स्त्री म्हणून अनेक बंधनांना तोंड द्यावं लागतं. तेथील देश खनिज तेलामुळे समृद्ध जरी झाले असले, तरी संस्कृतीच्या पातळीवर ते अजून प्राणी अवस्थेतच आहेत. याचं कारण स्त्रीचं दमन. कुटुंब, समाज आणि देश यांचं अस्तित्व टिकवायचं असेल, तर कुटुंब आणि स्त्री यांचं नातं ओळखून त्याप्रमाणे समाजव्यवस्था निर्माण करायला लागेल. स्त्रीमधील प्रचंड ऊर्जेला वाव द्यावा लागेल अन्यथा ती ज्वालामुखीसारखी उसळून बाहेर यायला वेळ लागणार नाही. फरक एकच असेल, ज्वालामुखी विध्वंस करतो तर स्त्री काहीतरी विधायक करेल. या दोघांत साम्यही आहे. ज्वालामुखीच्या विध्वंसातून नवसर्जन होते आणि स्त्री तर स्वत:च सर्जन आहे.

# पक्ष्यांची गाणी ऐकल्याने मानसिक आरोग्य सुधारते; यू गव्हचे सर्वेक्षण

पक्ष्यांचे निरीक्षण करणे आणि त्यांची मधुर गाणी ऐकण्याचा आरोग्यावर चांगला परिणाम होतो. यू गव्ह या संस्थेने केलेल्या एका व्यापक सर्वेक्षणाचा हा निष्कर्ष असून, नव्वद टयांपेक्षा जास्त लोकांना त्यामुळे आरोग्यदायी अनुभव आला आहे. रॉयल सोसायटी ॅर द प्रोटेशन ऑ बर्ड्स (आरएसपीबी) या संस्थेसाठी हे सर्वेक्षण करून मतदानही घेण्यात आले होते.निसर्गात रिणे ८८ टके लोकांना महत्त्वाचे वाटते. पक्षी हा निसर्गाचा अविभाज्य भाग असून, त्यांचे निरीक्षण करणे आणि त्यांची गाणी ऐकण्यामुळे मानसिक आरोग्यावर चांगला परिणाम होत असल्याचे ९१ टके लोकांनी नमूद केले.



आरएसपीबीच्या संकेतस्थळावर बर्ड साँग आयडेंटि ायर या नावाचा एक विभाग असून, त्यात चिमणी, वूड पिजन, दयाळ (रॉबिन) यांच्यासह अनेक पक्ष्यांचे आवाज आणि त्यांच्या गाण्यांची ऑडिओ लिपिंग्ज आहे आपले मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी लोकांनी वीकेंडला पक्ष्यांचे निरीक्षण करावे, त्यांची मोजणी करावी.त्यासाठी घराजवळची बागसुद्धा उपयुत ठरते. लोकांमध्ये पक्षीनिरीक्षणाची आवड वाढावी म्हणून आरएसपीबीने बिग गार्डन वॉच नावाचा कार्यक्रमसुद्धा सुरू केला आहे. केवळ एक तास यात सहभागी व्हायचे असून, त्या काळात पक्ष्यांच्या निरीक्षणाबरोबरच त्यांचे आवाज आणि गाणीही समजून घ्यावयाची आहेत.दिवसभरातील एक तास पक्ष्यांचे निरीक्षण करावयाचे आहे. सहभागींना बागेत जाऊन अथवा घराच्या बाल्कनीत बसूनसुद्धा ते करता येईल.

# क्रोएशियाच्या नॅशनल पार्कमधील तलाव जवळून पाहण्याचे आकर्षण



कोएशिया नावाच्या देशातील लिप्ट विस झील हे राष्ट्रीय उद्यान आता पर्यटकांसाठी खुले करण्यात आले आहे. या नॅशनल पार्कमधील तलाव जवळून पाहण्याचे पर्यटकांना जबरदस्त आकर्षण आहे. या तलावांच्या सभोवताली पायी चालण्यासाठी पूल बांधण्यात आले आहेत. येथे दरवर्षी कमीत कमी ५ लाख पर्यटक येत असतात. जागतिक वारसा स्थळांमध्ये या नॅशनल पार्कचा समावेश आहे. या नॅशनल पार्कमध्ये ३०० चौ. किलोमीटर परिसरात बुडलॅडस, अनेक गुहा आणि ओढे आहेत. येथे एकूण १६ तलाव आहेत. हे तलाव भातशेतीसारखे दिसतात. हिरवळीच्या मधोमध हे तलाव ङ्गनिळा समुद्रफ भासतात. हिवाळ्यामध्ये या तलावांचे पाणी गोठते. या काळात येथे मोठ्या संख्येने पर्यटक येतात. हॉटेल्स सोबतच पार्कमध्ये पायी चालणाऱ्या पर्यटकांसाठी लाकडी पूल तयार करण्यात आले आहेत. या भागात वन्यपशूदेखील पाहायला मिळतात. हे पर्यटन स्थळ १६० वर्षांपासून अस्तित्वात आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वयाच्या ५० मध्ये एकही सुरकुती दिसणार नाही

## फक्त या ५ प्रकारे तुरटी वापरा, डागही दूर होतील....



वयाच्या ५० मध्ये एकही सुरकुती दिसणार नाही,फक्त या ५ प्रकारे तुरटी वापरा, डागही दूर होतील

बहुतेक लोक घराशी संबंधित कामांसाठी तुरटीचा वापर करतात. पण, तुम्हाला माहिती आहे का की ते तुमच्या त्वचेसाठी देखील फायदेशीर ठरू शकते. खरं तर, तुरटीमध्ये विविध समस्यांसाठी अँटीबॅक्टेरियल आणि अँटीफंगल गुणधर्म भरपूर असतात. हे बॅक्टेरिया मारते आणि चेहऱ्यावरील जळजळ आणि खाज कमी करून त्वचा चमकदार बनवते. त्वचेसाठी तुरटीचा वापर अनेक प्रकारे करता येतो. बहुतेक लोक ते पाण्यात मिसळून चेहऱ्यावर लावतात. मुरुमांवर उपचार करण्यासाठी, त्वचेची छिद्रे घट्ट करण्यासाठी, त्वचा उजळ करण्यासाठी आणि जळजळ कमी करण्यासाठी हे प्रभावी असल्याचे मानले जाते. याशिवाय, त्याचे स्क्रबिंग गुणधर्म आणि पोटॅशियम त्वचा स्वच्छ करण्यास तसेच रंगद्रव्य कमी करण्यास मदत करतात. याशिवाय, तुरटीचे इतरही अनेक फायदे आहेत. पण त्याआधी आपण तुरटीपासून फेसपॅक बनवण्याची पद्धत जाणून घेऊया.

**टॅनिंगसाठी फिटकरीचा फेस पॅक**

टॅनिंगसाठी फिटकरीचा फेस पॅक खूप प्रभावीपणे काम करतो. त्यातील पोटॅशियम पेरोक्साइड क्लींजर म्हणून काम करते आणि नंतर टॅनिंगची समस्या वेगाने कमी करते. यामुळे त्वचेच्या छिद्रांमधील घाण साफ होते आणि काळेपणा कमी होतो. तसेच, कोरफड त्वचेला हायड्रेट करून ही समस्या आणखी कमी करण्यास मदत करते.

**तुरटीसोबत गुलाबपाणी लावा**

चेहऱ्यावरील हरवलेला चमक परत मिळवण्यासाठी तुरटी हा एक चांगला पर्याय आहे. तुम्ही ते गुलाब पाण्यासोबत लावू शकता. हे तयार करण्यासाठी, प्रथम आपण तुरटी पावडर बनवू. आता एक चमचा तुरटीमध्ये गुलाबपाणी मिसळून पेस्ट तयार करा. यानंतर, तयार केलेली पेस्ट चेहरा आणि मानेवर लावा.

आता हलक्या हातांनी वर्तुळाकार हालचालीत चेहऱ्यावर मालिश करा. सुमारे १५ मिनिटे लावल्यानंतर, चेहरा ताज्या पाण्याने धुवा. तथापि, लक्षात ठेवा की तुमचा चेहरा साबणाने किंवा फेस वॉशने धुवू नका. यानंतर मॉइश्चरायझर वापरा. असे केल्याने चेहऱ्याच्या समस्या कमी होतील. तुम्ही ही पेस्ट आठवड्यातून दोनदा लावू शकता.

**तुरटीसोबत ग्लिसरीन टोनरची मदत घ्या**

चेहरा चमकदार करण्यासाठी तुम्ही तुरटीसोबत ग्लिसरीन देखील वापरू शकता. तुम्ही ते टोनर म्हणून वापरू शकता. हे लावण्यासाठी, एका पॅनमध्ये पाणी गरम करा. आता त्यात तुरटी आणि काही तुळशीच्या पानांपासून तयार केलेली पावडर घाला. पाणी चांगले उकळले की गॅस बंद करा.

हे पाणी थंड झाल्यावर ते स्प्रे बाटलीत भरा. आता त्यात काही थेंब ग्लिसरीन घाला आणि मिसळा. आता तुम्ही हे टोनर चेहऱ्यावर वापरू शकता. असे केल्याने त्वचा घट्ट होते आणि चेहऱ्याच्या समस्यांपासून मुक्तता मिळते. तुम्ही हे टोनर दिवसातून १ ते २ वेळा देखील लावू शकता.

तुरटीसोबत मुलतानी माती लावा चेहऱ्याच्या समस्यांपासून मुक्त होण्यासाठी तुम्ही तुरटी आणि मुलतानी मातीची पेस्ट देखील लावू शकता. हे बनवण्यासाठी, तुरटी पावडर घ्या, ज्यामध्ये तुम्ही मुलतानी माती, गुलाबपाणी किंवा कोरफड जेल मिसळा. सर्वकाही चांगले मिसळा आणि पेस्ट बनवा. आता ही पेस्ट चेहऱ्यावर लावा आणि हलक्या हाताने स्क्रब करा. सुमारे २० मिनिटांनंतर, चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा. असे केल्याने चेहऱ्यावरील मुरुमांच्या खुणा आणि डाग दूर होण्यासही मदत होऊ शकते. याशिवाय, ही पेस्ट चेहऱ्यावर लावल्याने जळजळ आणि लालसरपणापासूनही आराम मिळतो. चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर करण्यासाठी घरगुती उपाय चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर करण्यासाठी, प्रथम एक घन तुरटी पाण्यात भिजवा आणि ती चेहऱ्यावर चोळा. थोडा वेळ चेहऱ्यावर तुरटी हलक्या हाताने चोळल्यानंतर, गुलाब पाण्याने चेहरा धुवा. यानंतर, त्वचेत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी मॉइश्चरायझर लावा. काही दिवसांतच तुमच्या चेहऱ्यावरील सुरकुत्या निघून जातील. चेहऱ्यावरील बंद छिद्रे उघडण्यासाठी, काही थेंब ऑलिव्ह ऑइलमध्ये एक चमचा तुरटी पावडर मिसळा आणि चेहऱ्यावर लावा. ही पेस्ट चेहऱ्यावर लावा आणि हलक्या हाताने चोळा. असे केल्याने, चेहऱ्यावरील मृत त्वचा काढून टाकण्यासोबतच, त्वचेशी संबंधित अनेक आजारांपासूनही आराम मिळतो.

# विकृतीचा कळस! ४ वर्षीय मुलीवर अत्याचार

## नंतर निर्घृणपणे संपवलं अन् पेटीत ठेवलं, सांगली हादरली

**सांगली :** राज्यात सध्या बालिका आणि महिलांवरील अत्याचाराच्या घटनेत मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. बदलापूरसारख्या संतापजनक घटनेतील आरोपीचा एन्काऊंटर होऊनही या घटना काही कमी व्हायचे नाव घेत नाही. अशातच सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील करजगी येथे एका ४ वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार करुन तिची हत्या केल्याची संतापजनक घटना घडली आहे. या घटनेने जत तालुकाच नव्हे तर जिल्हा हादरला आहे. संशयित आरोपी पांडुरंग सोमनिंग कळळी (वय ४५) यास उमदी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गुरुवारी सकाळी चिमुकलीची शाळेत जाण्याची वेळ झाली असता कुटुंबीय तिचा शोध घेऊ लागले. आजूबाजूला तिचा शोध घेत असता तिचा काही पत्ता न लागल्याने गावात दवंडी देऊन सुध्दा त्या मुलगी काही सापडली नाही. ही माहिती गावचे पोलीस पाटील व ग्रामस्थांनी उमदी पोलीस स्टेशनला कळवली. पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पत्र्याच्या शेड समोर बदामाच्या झाडाखाली संशयित आरोपी पांडुरंग सोमनिंग कळळी हा दारूच्या नशेत झोपलेला आढळून आला होता. त्या संशयित नराधमाला उमदी पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांना एका पत्र्याच्या घराच मुलीचा मृतदेह आढळून आला आहे. घराची झडती घेतली असता घरातील एका पेटीमध्ये पोते दिसले. पोत्यावर डाग असल्याने उघडून पाहिले असता त्यात मुलीचा मृतदेह आढळला. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी जत रुग्णालयात पाठवला आहे. गावकऱ्यांना हा प्रकार समजताच घटनास्थळी एकच गर्दी जमली होती. पोलिसांनी पांडुरंग कळळी-पुजारी याला ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवताच त्याने बालिकेचा खून केल्याची कबुली दिली आहे. दरम्यान, या घटनेनंतर गावातील नागरिकांकडून संपात व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

# रोहितने सांगितला मास्टर प्लॅन

**नागपूर :** रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचे भवितव्य हे चॅम्पियन्स ट्रॉफीवर अवलंबून असणार आहे. त्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा ही भारतासाठी सर्वात मोठी असेल. पण ही चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धा कशी जिंकता येऊ शकते, याचा मास्टर प्लॅन आता रोहित शर्माने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या विजयानंतर सांगितला आहे. भारतीय संघ बऱ्याच दिवसांनी वनडे सामना खेळण्यासाठी उतरला होता. पण भारताने या मालिकेतील पहिल्या सामन्यात इंग्लंडचा धुव्वा उडवला आणि पहिला सामना सहजपणे जिंकला. या विजयानंतर रोहित शर्माचे मनोबल उंचावले आहे. त्यामुळे आता चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा जिंकण्यासाठी भारताला कोणती एकच गोष्ट करावी लागेल, हे रोहित शर्माने सांगितले आहे. भारतीय संघ बऱ्याच दिवसांनी वनडे सामना खेळण्यासाठी उतरला होता. पण भारताने या मालिकेतील पहिल्या सामन्यात इंग्लंडचा धुव्वा उडवला आणि पहिला सामना सहजपणे जिंकला. या विजयानंतर रोहित शर्माचे मनोबल उंचावले आहे. त्यामुळे आता चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा जिंकण्यासाठी भारताला कोणती एकच गोष्ट करावी लागेल, हे रोहित शर्माने सांगितले आहे.पहिला वनडे सामना जिंकल्यावर रोहित शर्मा म्हणाला की, ङ्ङ बऱ्याच दिवसांनी आम्ही वनडे सामना खेळण्यासाठी मैदानात उतरलो होतो. त्यामुळे संघाची कामगिकी कशी होईल, याचे दडपण होते. पण भारताच्या खेळाडूंना दमदार कामगिरी करत हा सामना सहजपणे जिंकला. फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागात आमची दमदार कामगिरी झाली. चॅम्पियन्स ट्रॉफीत जर आम्ही अशीच कामगिरी केली, तर सर्व गोष्टी आमच्यासाठी सोप्या होऊ शकतात. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी फलंदाजी आणि गोलंदाजीतली बलस्थाने आम्ही ओळखायला हवीत आणि त्यानुसार जर आम्ही कामगिरी केली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तिघांच्या जाचाला कंटाळून युवतीची आत्महत्या

**जनसंचलन/मोताळा**

प्रेमसंबंध असल्याची खोटी बदनामी करून, तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याने त्रस्त झालेल्या २१ वर्षीय युवतीने विष प्राशन करून आत्महत्या केली. ही घटना १४ ते १६ मे दरम्यान मोताळा तालुक्यातील एका गावात घडली. याप्रकरणी बोराखेडी पोलिस ठाण्यात दि. २० मे रोजी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, विजू अशोक सोळंके, हिरामन सदाशिव पवार आणि प्रमिला हिरामन पवार (रा. परडा फाटा, ता. मोताळा) यांनी त्यांचा मुलगा विश्वजीत याच्याशी पीडित युवतीचे प्रेमसंबंध असल्याची अफवा पसरवली. यासोबतच तिला जीवे मारण्याच्या धमक्या देत मानसिक छळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या जाचाला कंटाळून युवतीने आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेतला. पोलिसांनी या तिघांविरुद्ध कलम १०८, ३५१ (२) भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र कपले करीत आहेत

# अवकाळी पावसामुळे शेतीचे नुकसान; एक जण गंभीर जखमी

**जनसंचलन/बुलडाणा**

मंगळवारी जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे नांदुरा आणि मेहकर तालुक्यातील सात गावांत अंदाजे २८.३० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. नांदुरा तालुक्यातील सहा गावांमध्ये केळी व ज्वारी, तर मेहकर तालुक्यातील एका गावात संत्रा पिकाचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. हवामानातील बदलामुळे नुकसानाची व्याप्ती वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, अंढेरा, शिवणी अरमाळ, पाडळी शिंदे व पांगरी येथे वीज पडून तीन गुरांचा मृत्यू झाला; तसेच कडब्याच्या गंजीला आग लागून वैरणही भस्मसात झाली आहे. पांगरी माळी येथे प्रल्हाद तुकाराम जायभाये यांच्या घरावरील टिनपत्रे उडून गेली, तर एका घरात थांबलेल्या सहा जणांना दुखापत झाली. त्यातील रवी शिवहरी उगले हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर जालना येथे उपचार सुरू आहेत

# काँग्रेसची बुलढाण्यात तिरंगा रॅली, मानवंदना

**जनसंचलन/बुलढाणा**

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त शहरातील हुतात्मा स्मारकावर बुधवारी अभिवादन करण्यात आले. यासोबतच ऑपरेशन सिंदूरमध्ये शहीद झालेल्या जवानांचे स्मरण करत सैन्यदलाच्या सन्मानार्थ जिल्हा काँग्रेसच्या वतीने बुलढाणा शहरात तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी अलीकडेच यशस्वी ठरलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर देशभरात शहीद जवानांच्या स्मृतीप्रित्यर्थ आणि वीर जवानांच्या गौरवासाठी विविध राजकीय व सामाजिक संघटनांमार्फत तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने बुलढाणा येथे काँग्रेस पक्षाच्यावतीने दहशत वाद विरोधी दिनाचे निमित्त साधत ही तिरंगा रॅली काढण्यात आली. जयस्तंभचौकातून या रॅलीचा प्रारंभ होऊन हुतात्मा स्मारक येथे समारोप झाला.. स्मारकावर शहीद जवानांना पुष्प अर्पण करत माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनाही अभिवादन करण्यात आले. या वेळी आ. धीरज लिंगाडे, सुनील तायडे, दत्ता काकस, जाकिर कुरेशी, आमिन टेलर, विजय मोरे, कांताभाऊ चव्हाण, शेख मुजाहिद, अॅड. प्रवीण सुरडकर, अॅड. सानप यांच्यासह अन्य उपस्थित होते.

# रस्ता ओलांडताना टिप्परच्या धडकेत एक ठार

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

येथील वृत्तपत्र वितरक राहुल यशवंतराव गवई (५०) यांचा दगडवाडी फाट्याजवळ एका भरधाव टिप्परच्या धडकेत जागीच मत्य याला ही घटना देऊळगाव राजा तालुक्यातील दगडवाडी फाट्याजवळ मंगळवारी घडली. राहुल गवई हे एका विवाह सोहळ्यासाठी दगडवाडी फाट्याजवळ गेले होते. रस्ता पार करत असताना भरधाव टिप्परने त्यांना चिरडले. त्यामुळे ते जागीच ठार झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मलगी आणि तीन भाऊ आहेत

# खांबावरून पडला; कामगाराचा मृत्यू

**जनसंचलन/ खामगाव**

सुटाळाबु, शिवारात २० मेरोजीएकाघराच्या बांधकामादरम्यान झालेल्या अपघातात एका कामगाराचा मृत्यू झाला. चंद्रकांत मनोहर वरणकार (३२, मूळगाव जळगाव जामोद, सध्या रा. सुटाळा बु, खामगाव), असे मृत व्यक्तीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रकांत एका घराच्या बांधकामासाठी खांबावर चढला होता. यावेळी तोल जाऊन तो थेट घरावर कोसळला. घराच्या छतावरून बाहेर आलेल्या लोखंडी आसाऱ्यांवर पडल्याने त्या थेट त्याच्या पोटात घुसल्या. त्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर सहकाऱ्यांनी तातडीने मदत केली; मात्र तोपर्यंत चंद्रकांतचा श्वास थांबला होता. शिवाजीनगर पोलिस ठाण्यात या घटनेची अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे

# अग्रेसन महाराजांच्या पुतळ्याला अतिक्रमणाचा वेढा!

## समाज बांधवात रोष, न.पा. मुग गिळून!





**जनसंचलन/बुलढाणा**

कारंजा चौकातील श्री अग्रेसन महाराज पुतळ्यासमोरील अतिक्रमण हटविण्याची मागणी समोर आली आहे.या संदर्भातील निवेदन देखील संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.परंतु कारवाई होत नसल्याने समाज बांधवात रोष व्यक्त होत आहे.यासंदर्भात नगरपालिकेची तोंडावर बोट हाताची घडी अशी भूमिका दिसून येते. कारंजा चौक येथील अग्रेसन महाराजांच्या पुतळ्याच्या आजूबाजूला थाटलेले व वाहतूकीला कोंडी निर्माण करणाऱ्या टपरी टाकून केलेले अतिक्रमण तात्काळ हटवावी,अशी तक्रार गौरव राजेश अग्रवाल यांनी केली आहे. गौरव राजेश अग्रवाल म्हणाले की, बुलढाणा येथील कायमचा रहिवाशी असून माझी दुकान ही अनेक वर्षापासून कारंजा चौक येथे आहे. तसेच कारंजा चौकाला लागून भव्य अग्रेसन महाराजाचा पुतळा बसविण्यात आलेला आहे व त्या पुतळ्याचे अनावरण तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले होते. तेव्हा पुतळ्याच्या आजूबाजूला नगर परिषद मार्फत अवैधरित्या टपरी टाकून केलेले अतिक्रमण काढण्यात आले होते. परंतू पुतळ्याचे अनावरण झाल्याच्या २ ते ३ महिन्यानंतर अनेक लोकांनी उर्दू शाळा व अग्रेसन महाराज यांचे पुतळ्याच्या अवतीभवती व न.प.च्या बांधकाम विभागाच्या समोर व आरोग्य विभागाच्या लगत अनाधिकृतरित्या अतिक्रमण तयार केले आहे. तसेच अग्रेसन महाराज यांचे पुतळ्याच्या बाजूलाच धुम्रपान करतात व पान खावून त्या पुतळ्याच्या बाजूलाच थुंकतात, त्यामुळे पुतळ्याची एक प्रकारे विटबंना होण्याची शक्यता आहे. तसेच बाजूला सोडयाचे दुकान असून त्या दुकानात असंख्य ग्राहक येतात. त्यामुळे या रहदारीच्या रस्त्यावरच खूप गर्दी असते. दूषीत पाणी सुध्दा रोडवर सोडण्यात येते. यामुळे तेथे घाणीचे साम्राज्य तयार झाले आहे. तसेच रविवारच्या वेळेस पार्किंगच्या जागेवर लोक मोठ-मोठी दुकाने टाकून अतिक्रमण करुन वाहतूकीस कोंडी करतात. यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होवून जीवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.असे निवेदनात म्हटले आहे.

# पालिकेकडून अतिक्रमणांवर कारवाईस टाळाटाळ?

**जनसंचलन/ खामगाव**

प्रभाग क्रमांक ५२ मधील गवळीपुरा भागातील रहिवासी मोहम्मद युसुफ शेख मोहम्मद यांनी आपल्या शेजाऱ्याने चार फूट रुंदीच्या सर्व्हिस लाईनवर अनधिकृत बांधकाम करून गल्ली अडविल्याचा आरोप केला आहे. या अतिक्रमणामुळे त्यांच्या घरातील सांडपाण्याचा निचरा होत नसून, आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. या अतिक्रमणाबाबत त्यांनी नगरपालिका प्रशासनाकडे




अनेकवेळा तक्रार दिली. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. नगरपालिकेने अतिक्रमण विरोधात कठोर पावले उचलून संबंधित बांधकाम त्वरित हटवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पुष्पांना आता चंदन नव्हे खैर पाहिजे!....

# देऊळघाट वनपरिक्षेत्रात खैर वृक्षांवर बेकादेशीर कुऱ्हाड! किती झाडे होती, किती राहिली? याची माहिती वन विभागाकडे नाही!

**जनसंचलन/ देऊळघाट**

जिल्ह्यात चंदन झाडांची तस्करी तर झालीच आता देऊळघाट वनपरी क्षेत्रात अवैधपणे खैर या वृक्षाची मोठ्या प्रमाणात तस्करी झाल्याचे आरोप होत आहे.याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते सय्यद इरफान सय्यद अख्तर यांनी माहिती मागितली असता त्यांना टोलवा टोलवी करण्यात आली. बुलढाणा वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या कार्यालयाअंतर्गत असलेल्या देऊळघाट येथील वनपरिक्षेत्रातील खैर या वृक्षांच्या झाडाची बेकायदेशीरपणे कत्तल करण्यात आली आहे. याबाबत माहिती या भागातील सामाजिक कार्यकर्ते सय्यद इरफान सय्यद अख्तर यांनी बुलढाणा वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अंतर्गत मागितलेली असता त्यांनी माहिती देता येत नसल्याचे पत्र संबंधित कार्यकर्त्यांना दिले आहे.त्यामुळे संशय बळावला आहे.हा प्रकार वनविभागाच्या तोंडाला काळे फासण्याचा असल्याचे आरोप .. कार्यकर्ते सय्यद इरफान यांनी केला आहे. त्यांनी दिलेल्या माहिती अधिकार अंतर्गतच्या अर्जात नमूद केले आहे की, मौजे देऊळघाट शिवारातील ङ्खङ्खखैरङ्खङ्ख जातीच्या वनवृक्षांना तोडण्याच्या पासेस ज्या लोकांना दिला त्यांची नावे द्या तसेच त्यांना किती झाडे तोडण्याची परवाना पास दिली? या माहितीसह ङ्खङ्खखैरङ्खङ्ख या वन वृक्षांची किती झाडे उभी आहेत? व झाडे तोडण्या वेळी किती झाडे होती? याबाबत माहिती मागितली मात्र त्यांना यापूर्वी त्रयस्थ व्यक्तीकांनी सदर माहिती मागितली असल्याने सदर माहिती देता येत नाही असे पत्र देऊन दिशाभूल करण्याच्या प्रयत्न केला आहे. तरी या प्रकरणी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदर प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देण्याबाबतच्या सूचना कराव्यात त्याचप्रमाणे माहिती




देण्यास टाळाटाळ करणाऱ्या बुलढाणा वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेवर बेजबाबदारपणे वागल्या प्रकरणी त्यांचेवर शासन नियमाप्रमाणे कारवाई करावी अशी मागणी त्यांच्याकडून करण्यात आली आह

# धाड बसस्थानक परिसरातील अतिक्रमण हटवीण्याच्या कारवाहीत सावत्रपणा...

## बांधकाम विभागाची दादागिरी गरिबावरच व्यापाऱ्यांच्या साहित्याचे केले नुकसान....

**जनसंचलन/धाड**

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते धामणगाव रस्त्यावरील बसस्थानक परिसरातील अतिक्रमण घटविण्याची कार्यवाहीत १८ मे रोजी अचानक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांचा फौजफाटा घेवून तुघलकी पध्दतीने अचानक जेसीबीच्या मदतीने सरळ थोडं करीत अतिक्रमण काढणे सुरू केले या प्रकारामुळे गोगरीब व्यापाऱ्यांच्या दुकानातील मालाची नासधूस करण्यात आली, प्रशासनाच्या या वर्तवणुकीमुळे स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली धाड मध्ये चौकापासून ते बस स्थानक रस्त्यावर बाजरपेठे आहे. स्थानिक व्यापाऱ्यांची रस्त्याच्या दुतर्फा पक्के व स्वतः च्या मालकीच्या जागेमध्ये दुकान आहे. बसस्थानक परिसरात काही व्यापारी अतिक्रमणमध्ये दुकान थाटून बसले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तीन महिण्यापुर्वी सबंधीत अतिक्रमण धारकांना नोटीस बजावली होती. मात्र १८ मे रोजी व्यापाऱ्यांना फुठलेही सुचना न देता सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता दिपक चिंचोले व पथक अतिक्रमणापर कार्यवाहीसाठी पोहचल या रस्त्यावरील दुतर्फा दुकाने असताना एक लाईनमधील पक्के बांधकाम असलेल्या काही दुकानाचे अतिक्रमण वाचवण्यासाठी दुसऱ्या लाईन मधील टीनपत्राच्या असलेल्या दुकानामध्ये मोजमाप करतांना रस्त्याचा मध्य हा काही मीटरने कच्च्या दुकानाकडे सरकेविण्यात आले. यायावत स्थानिक व्यापारी यांनी सबधीत उपविभागीय अभियंता यांना विचारणा केली असत्ता उडवाउब्वविचे उत्तर देवून संबधीत अधिकारी पसार झाले. व्यापारी आपल्या दुकानासमोरील पत्रे कातत असतांना सुध्दा जेसीबीची द्वारे दुकान पाडण्याचे काम करण्यात आले. तर अनेक व्यापारी यांचे साहित्याचे नुकसान झाले. काही व्यापाऱ्यांना सावत्रपणाची वागणूक मिळल्यामुळे




या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. आमच्या वर अन्याय करित रस्त्याचे मोजमाप चुकिच्या पध्दतीने काण्यात आले. यामध्ये राजकीय तंत्राचा वापर करण्यात आलाची तक्रार स्थानिक व्यापाऱ्यांनी केली आहे. सदर रस्त्यावर बीडीसीसी बँकेच्या वतीने कॉम्प्लेक्स बांधकाम करण्यात आलेले असून त्यांच्या हद्दी बाहेर बांधकाम विभागाची जुनी नाली असून तिच्यावर ओटे तयार करण्यात आलेले आहे.करवाहीच्या वेळी वास्तविक पाहता विभागाकडून बस स्थानक समोरील गाळ्याला खेटून आलेली हद्द ही चौकात असलेल्या गाळ्या जवळ १० फूट बाजूला करण्यात आली. वास्तविक पाहता रस्त्याचे बांधकाम करण्यापूर्वी विभागाकडून हद्द कायम करणे अपेक्षित होते परंतु दरम्यान ठेकेदाराने बँकेच्या गाळ्याकडून डा तातेड यांच्या रुग्णालयापासून ते कोहिनूर इलेक्ट्रिक पर्यंत सिमेंट रस्ता पूर्ण केला.सदर रस्त्याचे बांधकाम करतांना ठेकेदाराने रस्ता हा कोहिनूर इलेक्ट्रिक जवळ रस्त्याचे तोंड हे कमीत कमी दहा फ ूट पक्या दुकानाकडून कच्च्या टीनपत्राच्या दुकानाकडे केल्याने गरीब दुकान दाराकडे सरकवल्याने रस्त्याचा मध्य हा सरकला त्यामुळे पहिले मोजणीत दुकाना बाहेर आलेले माप आता दुकानाच्या आत आले.याप्रकारामुळे टपरीधारका मध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला असून हे नेमके कोणाच्या सांगण्यावरून किंवा कोणाचे हित संबंध व दबावामुळे तर झाले नाही अशी चर्चा सुरू आहे. बांधकाम विभागाने निष्पक्षपणे मोजणी करून अतिक्रमण कारवाही करावी बांधकाम विभागाने निष्पक्षपणे रस्त्याचा मध्य काढून अतिक्रमण काढण्याची कारवाही करण्याची मागणी जनसामान्यां कडून होत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८